# Shri Vijay Kumar, IAS, Secretary, MoPSW, Reviews On-Ground Progress of Vadhvan Port Development; Interacts with Stakeholders

*Visited Varor Site with CMD, VPPL and other officials*

**Mumbai, September 28th,2026:** Shri Vijay Kumar, IAS, Secretary, Ministry of Ports, Shipping and Waterways (MoPSW), Government of India, visited the Vadhvan Port project site in Palghar district to review the progress of the ambitious greenfield deep-draft major port being developed by Vadhvan Port Project Limited (VPPL).

Gaurav Dayal, IAS, Chairman, Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) and CMD, VPPL, along with the Collector of Palghar district, Dr. Indurani Jakhar, IAS, Yatish Deshmukh, IPS, SP, Palghar District, Ravish Kumar Singh, IRTS, CEO, VPPL, senior officials from VPPL, JNPA and other concerned agencies, accompanied the Secretary during the site visit and provided updates on the project's progress.

During the visit, the Secretary reviewed the progress of key components of the project and took stock of the ongoing activities at the project site. The review covered various workstreams associated with port development, including near-shore reclamation, breakwater construction, external connectivity, land acquisition, and utility infrastructure.

He was briefed by the VPPL team on the progress achieved across different components of the project and the activities planned for the coming phases. He also interacted with the stakeholders.

The Secretary emphasised the importance of close coordination among all stakeholders and maintaining momentum across the different work fronts to ensure timely execution of the project. He also reviewed the preparedness for scaling up construction activities as various enabling works and critical project requirements progress in parallel.

Providing further details, **Gaurav Dayal, IAS, CMD, VPPL,** said, *"The Secretary, MoPSW's visit and detailed review of the project provided valuable guidance on accelerating*

*progress across the various work fronts. The project is advancing in a structured and time-bound manner, while maintaining the highest standards of quality, sustainability and operational preparedness."*

VPPL continues to advance as a project of national significance, poised to strengthen India's maritime capacity, enhance trade competitiveness and contribute to the nation's long-term economic growth.

*****

**About VPPL:**

Vadhvan Port Private Limited (VPPL) is the 13th major port of India, a special purpose vehicle (SPV) formed between Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) and the Maharashtra Maritime Board (MMB). Strategically located in Palghar district, near Dahanu, Maharashtra, VPPL is poised to be among the top 10 ports globally. The foundation stone for the port was laid on August 30th, 2024, by the Hon'ble Prime Minister of India, Shri Narendra Modi.

Committed to sustainability, VPPL will be 100% green from inception, ensuring minimal environmental impact. The port is set to enhance trade efficiency with the capacity to handle 24 million TEUs, stimulate economic growth, and contribute to regional development. Through initiatives like the Vadhvan Port Skilling Program, VPPL focuses on empowering local communities.

**Visit our website and social media to learn more:**

VPPL Website: https://vadhvanport.in/ | X - VadhvanPort | Facebook - Vadhvan Port Project Ltd | Instagram - vadhvanport | LinkedIn - Vadhvan Port Project Ltd

**For media enquiries, please contact:**
Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +919920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in

# केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग मंत्रालयाचे सचिव श्री. विजय कुमार, भा. प्र. से. यांनी वाढवण बंदर विकासाच्या प्रत्यक्ष प्रगतीचा घेतला आढावा; भागधारकांशी साधला संवाद

***सीएमडी, व्हीपीपीएल तसेच अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत वरोर येथील परिसराची पाहणी केली***

**मुंबई, 28 सप्टेंबर 2026:** भारत सरकारच्या बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग मंत्रालयाचे सचिव श्री. विजय कुमार, भा. प्र. से. यांनी पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर प्रकल्पाला भेट देत, वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) मार्फत विकसित करण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी ग्रीनफिल्ड डीप-ड्राफ्ट प्रमुख बंदराच्या विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे (जेएनपीए) अध्यक्ष तथा व्हीपीपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गौरव दयाल, भा. प्र. से., पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, भा. प्र. से, पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, भा. पो. से., व्हीपीपीएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविश कुमार सिंह, भा. रे. वा. से., तसेच व्हीपीपीएल, जेएनपीए आणि संबंधित विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी सचिवांसोबत उपस्थित होते. त्यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थिती व प्रगतीबाबत सचिवांना माहिती दिली.

भेटीदरम्यान सचिवांनी प्रकल्पाच्या विविध प्रमुख घटकांच्या प्रगतीचा आढावा घेतला तसेच प्रकल्पस्थळी सुरू असलेल्या कामकाजाची सद्यस्थिती जाणून घेतली. यामध्ये बंदर विकासाशी संबंधित विविध कामांचा समावेश होता. त्यात किनाऱ्यालगतच्या भरावाचे काम, ब्रेकवॉटरची उभारणी, बाह्य दळणवळणाची जोडणी, भूसंपादन तसेच पायाभूत सुविधा व उपयुक्तता सेवांशी संबंधित कामांचा आढावा घेण्यात आला.

व्हीपीपीएलच्या पथकाने प्रकल्पाच्या विविध घटकांमध्ये झालेल्या प्रगतीबाबत तसेच आगामी टप्प्यांमध्ये नियोजित करण्यात आलेल्या कामकाजाची माहिती सचिवांना दिली. यावेळी त्यांनी विविध भागधारकांशी संवाद साधून त्यांचे म्हणणेही जाणून घेतले.

प्रकल्पाची वेळेत अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सर्व भागधारकांमध्ये घनिष्ठ समन्वय राखण्याबरोबरच प्रकल्पाच्या विविध आघाड्यांवरील कामांना सातत्यपूर्ण गती देण्याच्या महत्त्वावर सचिवांनी भर दिला. विविध पूरक कामे आणि प्रकल्पाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या बाबी समांतरपणे पुढे जात असताना, बांधकामाच्या कामांना व्यापक स्वरूपात गती देण्यासाठी आवश्यक पूर्वतयारीचाही त्यांनी आढावा घेतला.

याबाबत अधिक माहिती देताना, **व्हीपीपीएलचे सीएमडी गौरव दयाल, भा. प्र. से.,** म्हणाले, *"बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग मंत्रालयाच्या सचिवांची भेट आणि प्रकल्पाचा सविस्तर आढावा यामुळे प्रकल्पाच्या विविध कामांना गती देण्यासाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी संरचित आणि निर्धारित कालमर्यादेनुसार पुढे जात असून, कामाच्या प्रत्येक टप्प्यावर उच्च दर्जाचे मानदंड, शाश्वतता आणि कार्यान्वयनासाठीची आवश्यक सज्जता यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे."*

व्हीपीपीएलचा राष्ट्रीय महत्त्वाकांक्षेचा प्रकल्प म्हणून विकास सुरू असून, तो भारताची सागरी क्षमता अधिक बळकट करण्यास, व्यापारातील स्पर्धात्मकता वाढविण्यास आणि देशाच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाला चालना देण्यास महत्त्वपूर्ण योगदान देणार आहे.

*****

**व्हीपीपीएल संदर्भात माहिती:**

वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (VPPL) हे देशाचे १३वे मोठे बंदर असून, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (JNPA) आणि महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड (MMB) यांच्या संयुक्त भागीदारीत स्थापन करण्यात आलेले एक विशेष उददिष्ट असलेले कंपनी रूपातील उपक्रम आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळ वसलेले हे बंदर जागतिक स्तरावर आघाडीच्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवण्यास सक्षम आहे.३० ऑगस्ट २०२४ रोजी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या बंदराच्या भूमिपूजनाचा ऐतिहासिक क्षण घडला.

निसर्गपूरकतेला प्राधान्य देत, वाढवण बंदर हे शंभर टक्के हरित तत्त्वावर आधारित असणार आहे, जे पर्यावरणावर कमीत कमी परिणाम करत अधिक कार्यक्षमतेने काम करेल.२४ दशलक्ष टीईयू (TEU) माल हाताळण्याची क्षमता असलेले हे बंदर देशाच्या व्यापार कार्यक्षमतेला गती देणार आहे. या माध्यमातून आर्थिक प्रगतीला चालना मिळेल आणि परिसराचा सर्वांगीण विकास होईल. वाढवण पोर्ट कौशल्य कार्यक्रमांसारख्या उपक्रमांद्वारे स्थानिक समुदाय सशक्त करण्यावर वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड विशेष भर देत आहे.

**अधिक जाणून घेण्यासाठी आमच्या संकेतस्थळावर आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

व्हीपीपीएल संकेतस्थळ - https://vadhvanport.in/ | फेसबुक - Vadhvan Port Project Ltd

X- VadhvanPort | इंस्टाग्राम - vadhvanport | लिंक्डइन - Vadhvan Port Project Ltd

**माध्यम प्रतिनिधींनी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा:**

अंबिका सिंग,

वरिष्ठ व्यवस्थापक (मार्केटिंग), जेएनपीए

मोबाईल क्र. : +919920372677

ईमेल: ambikasingh@inport.gov.in